■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २७८ ■ गुरूवार दि.२६ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 278 ■ Thursday Dt.26 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेमध्ये एक हजार आठशे कोटींचा घोटाळा..?

## आष्टी तालुक्यात जलजीवनचे काम न करणाऱ्या दोषी गुत्तेदारांवर होणार कारवाई!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# जलजीवन मिशनच्या ५२ कामात गुत्तेदारांकडून दिरंगाई; १६ कामे अद्याप सुरुच नाही?

## आजी-माजी मंत्री, खासदार, आमदार यांच्या कार्यकर्त्यांचा १८०० कोटींच्या भ्रष्टाचारात सहभाग?

## बीड जिल्ह्यातील अनेक गुत्तेदारांच्या कामाची सखोल चौकशीची गरज?

## जलजीवन मिशन योजनेतील भ्रष्टाचारात मोठमोठे मासे अडकण्याची दाट शक्यता?

बीड । प्रतिनिधी

जनतेची तहान भागावी यासाठी ग्रामीण भागासह शहरी भागातही जलजीवन मिशन योजना सुरू आहे. या योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यात १७२ गावांमध्ये काम सुरू आहेत. १७२ गावांपैकी १३ गावांमध्ये ही योजना पूर्णपणे राबवली जात आहे तर उर्वरित गावांमध्ये जुन्या योजना पुनर्जीवित करण्यात येत आहेत. परंतु या कामांमध्ये गुत्तेदारांकडून नियमांची पायमल्ली होताना दिसत आहे. काम सुरू न केलेल्या व कामात दिरंगाई करणाऱ्या गुत्तेदारांवर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी आष्टी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे उप अभियंता यांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे अहवाल पाठवला आहे. यानंतर संबंधित गुत्तेदारांवर काय कारवाई केली जाणार आहे हे येत्या काही दिवसात समोर येईल.

आष्टी तालुक्यामध्ये जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत १७२ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याचे कामे सुरू आहेत. यामध्ये १५९ गावांमध्ये पूर्वी असलेल्या पाणीपुरवठा योजना दुरुस्त करून गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी कामे सुरू आहेत तर केवळ तेरा गावांमध्ये पाणीपुरवठा योजना ही पूर्णपणे नवीन आहे. असे असतानाही संबंधित गुत्तेदारांकडून शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये योजनेचे काम पूर्ण होताना दिसत नाही. आतापर्यंत आष्टी तालुक्यातील केवळ ४६ गावांमध्ये जल जीवन मिशन योजनेचे काम शंभर टक्के पूर्ण झालेले आहे. यामध्ये पूर्णपणे नवीन पाणीपुरवठा योजना राबवण्यात येणाऱ्या गावांची संख्या फक्त तीन आहे. ५२ गावांमध्ये जलजीवन मिशनच्या कामामध्ये गुत्तदारांकडून दिरंगाई होताना दिसत आहे तर १६ गावांमध्ये संबंधित गुत्तेदारांनी कामच सुरू केले नाहीत. ज्या गुत्तेदारांनी कामे सुरू केले नाहीत व कामांमध्ये दिरंगाई केले आहे अशा गुत्तेदारांवर कारवाई करण्यात यावी यासाठी आष्टीच्या ग्रामीण ग्रामीण पुरवठा विभागाच्या उपअभियंताने कार्यकारी अभियंता बीड यांच्याकडे अहवाल पाठवला आहे.



### या गावात अद्याप काम सुरु नाही

जल जीवन मिशन सुरू होऊन दोन वर्षाहून जास्त कालावधी लोटला असतानाही अद्याप हनुमंतगाव, लमानतांडा, बळेवाडी पारगाव, देवीनिमगाव, खुंटेफळ, मुर्शदपुर, अंबोरा, बीडसांगवी, बिरंगलवडी, जळगाव, राळेसांगवी, पिंपळगाव सुट्टी, कासारी, भोजेवाडी या गावांमध्ये जल जीवन मिशनचे कामे सुरू झालेली नाहीत.

### या गावांमध्ये कामात दिरंगाई

नांदा, दैठणा, धिर्डी, केळसांगवी, कऱ्हेवाडी, वाकी, पांगुळगव्हाण, मातावळी, हाजीपुर, करंजी, जळगांव, वनवेवाडी, कासारी, भाळवणी, शिराळ, डोईठाण, बिरंगळवाडी, पिंपळसुटटी, नांदा, निमगांवचोभा, देवीनिमगांव, महादेववाडी, कोल्हेवाडी, घाटापिंप्री, लमानतांडा (गहुखेल), चिंचेवाडी, गंगादेवी, खाकाळवाडी, बावी, कापशी, लाटेवाडी/महाजनवाडी, खलाटवाडी, नागतळा, मोराळा, लमानतांडा (मोराळा), वनवेवाडी (मोराळा), अरणविहीरा (डो), केळ, खडकवाडी, लमानतांडी, राळेसांगवी, शेडाळा, उंदरखेल, पुंडी (बो), धनगरवाडी (पिं), बोरोडी, माहिंदा, खुंटेफळ (पुं), भोजेवाडी, धनगरवाडी, पाटसरा, निमगांव

### गुत्तेदारांबरोबर दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई करा

आष्टी तालुक्यामध्ये जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये गुत्तेदारांनी दिरंगाई केली आहे त्याचबरोबर काही गावांमध्ये अद्यापही कामे सुरू झालेली नाहीत. अशा गुत्तेदारांवर कारवाई करण्यासाठी उपअभियंता आष्टी यांनी कार्यकारी अभियंता यांना पत्र पाठवून कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित गुत्तेदारांवर कारवाई देखील होईल. परंतु यामध्ये गुत्तेदार जेवढे जबाबदार आहेत तेवढेच आष्टी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारीही जबाबदार आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांची चौकशी होऊन त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी.

**–कैलास दरेकर,** शेतकरी सेना मनसे बीड जिल्हाध्यक्ष

# गेवराईत भंगार घोटाळ्याचा खळबळजनक पर्दाफाश

## तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करून निलंबनाची मागणी!

### तहसीलदार खोमणे यांच्यावर सय्यद एजाज यांचा हल्लाबोल: भंगार घोटाळा उघड, कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तहसील कार्यालयात भंगार लिलाव प्रक्रियेत तहसीलदार संदीप खोमणे यांनी संगनमत करून भंगार घोटाळा केल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक सय्यद एजाज इफ्तेखार अहमद यांनी केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने जप्त वाहनांच्या भंगार लिलावाचे आदेश दिले होते, परंतु तहसीलदार संदीप खोमणे यांनी लिलाव प्रक्रियेत गैरप्रकार करत पारदर्शकतेचा भंग केल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणी तात्काळ चौकशी समिती स्थापन करून तहसिलदार खोमणे यांना निलंबित करण्याची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



तक्रारीनुसार, लिलावाच्या तारखा वारंवार पुढे ढकलण्यात आल्या आणि २९ मे २०२५ रोजी झालेल्या लिलावात गंभीर अनियमितता आढळल्या. ७ ते ८ जणांनी एका व्यक्तीच्या नावाने अर्ज सादर केले आणि बोलीसाठी चक्क दुसऱ्या व्यक्तींना बसवले गेले. याशिवाय, एकाच व्यक्तीने दोन अर्ज सादर करून दोन जणांनी लिलावात सहभाग घेऊन प्रशासनाची फसवणूक केली. लिलावादरम्यान संगनमताची चर्चा तहसील कार्यालयाच्या कॅमेऱ्यात कैद झाली आहे. तक्रारदाराने लिलाव जाहीर प्रगटणीत नमूद १०,००० रुपये ठेवीच्या नियमांचे उल्लंघन करत खोमणे यांनी रोख रक्कम स्वीकारल्याचा आरोप केला आहे. माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी मागणी केली आहे की, तहसीलदार खोमणे यांच्यावर तात्काळ चौकशी समिती स्थापन करून लिलाव दरम्यानचे कॅमेरा

पान २ वर

# बीडच्या जिल्हा परिषदेतील कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे एसीबीच्या जाळ्यात

### लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची मोठी कारवाई; शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गावामध्ये करण्यात आलेल्या भूमिगत नालीचे काम पूर्ण झाल्यानंतर अंतिम बिल मंजुरीसाठी पाठवण्यासाठी कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे व वरिष्ठ लिपिक किरण कुमार हिवाळे या दोघांना ८० हजार रुपयाची लाच घेताना बुधवारी जिल्हा परिषदेतील त्यांच्या दालनामध्ये पकडले. या प्रकरणात दोघांच्या विरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे तक्रारदाराने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजनेअंतर्गत भूमिगत नालीचे काम केले होते. हे काम पूर्ण झाल्याच्या अंतिम बिलाच्या नोटीशीटवर सही करून वरिष्ठांकडे बिल मंजुरीसाठी पाठवण्याकरता मुकुंद आंधळे व किरण कुमार हिवाळे यांनी ८५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. याबाबतची तक्रार बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर खातरजमा करण्यात आली. त्यानंतर सापळा रचत तक्रारदाराला जिल्हा परिषद कार्यालयात पाठवण्यात आले. त्या ठिकाणी ८० हजार रुपयाची लाच स्वीकारताना मुकुंद आंधळे व किरणकुमार हिवाळे या दोघांना रंगेहात पकडण्यात आले. याप्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



# रोहन गलांडे यांच्या अमरण उपोषणाला आले यश

## सप्ताह कमिटी व नामदेव महाराज भक्तांचे मानले आभार

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे ७ जुन ते १६ जुन पर्यंत रोहन दादा गलांडे पाटील यांनी विविध मागण्या साठी अमरण उपोषण केले होते मागण्या अशा होत्या की नागबेट वस्ती ते श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र अतिक्रमण हटवा तर ८० टक्के अतिक्रमण हटविण्यात आले आहे राहीले आहे ते ग्रामपंचायत हद्दीतील ते सुद्धा ७ सात दिवसांत हटविण्यात येईल तसेच काही क्षनीक सुखा साठी दोन चार बांधकामावर स्टे आला आहे ते सुद्धा पावसाळा संपला की हटविण्यात येईल असे जिल्हा परिषद बांधकाम यांनी लेखी दिले आहे महाराष्ट्रतील शेतकरी कर्जमाफी, बँक खात्यावरील होल्ड काढणे, पिकांना हमीभावासाठी कायदा, व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत या विषयावर कलेक्टर यांच्या सोबत रोहन गलांडे यांचे बोलने झाले असून या मागणीसाठी सरकार कडे मागणी केली आहे असे कलेक्टर विवेक जॅक्सन यांनी म्हटले आहे.



चिंचोली माळी बाजार स्थळ घरे असल्याने पावसाळा संपला की हटविण्यात येईल असे ग्रामपंचायतने लेखी पत्र दिले,श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील सर्व अतिक्रमण हटवा या मागणीसाठी दोन दिवसांत हटविण्यासाठी सचरवात होईल, चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तात्काळ सुरू करा या मागणीसाठी काही कालावधी लागनार आहे कारण शासना कडे निधी उपलब्ध नाही. पाधन रस्ता ५१, ५२, ५३ ची कॉलीटी कंट्रोल मार्फत चौकशी करण्यासाठी कार्यालयाला कळविण्यात आले आहे तरी चौकशी होईपर्यंत बिल अदा करण्यात येणार नाही असे लेखी पत्र दिले आहे व तसेच काळ्याचा मळा येथील बंधाऱ्यांची चौकशी होईपर्यंत बिल अदा करण्यात येणार नाही असे लेखी पत्र देण्यात आले आहे तरी अशा प्रकारे रोहन गलांडे पाटील यांच्या अमरण उपोषणाला यश आले आहे आहे, असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तसेच प्रशासनाच्या वतीने आमरण उपोषण मागे घेतले.

यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे, तहसीलदार गिट्टे साहेब, बंडु गव्हाणे, डिप्टीइंजिअर मिसाळ साहेब, सप्ताह कमीटीचे आध्यक्ष विजय माने, संजय महाराज नखाते, विजय गायकवाड, लक्षीमन तात्या गलांडे, गौतम बापु गलांडे, आकाश नखाते, अनिल गलांडे, विजय गलांडे, महादेव गलांडे, राहुल नखाते सह सर्व गाडेओढनारी भक्त व सर्व श्री संत नामदेव महाराज भक्त, गावकरी उपस्थित होते.

# पाटोदा तालुका शिवसैनिकांची जिल्हाप्रमुखानी घेतली बैठक

## पाटोदा अल्पसंख्यांक तालुका प्रमुख पदी शेख असिफ यांची निवड



पाटोदा । प्रतिनिधी

आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थेच्या प्रमुख निवडणूकीच्या अनुषंगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्ष बांधनीचे काम जिल्हाप्रमुख उल्हास गिराम करत आहेत. आज पाटोदा येथील शासकीय विश्रामगृहावर तालुक्यातील शिवसैनिकांची बैठक घेऊन शेख असिफ सहेबलाल यांची अल्पसंख्यांक तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली.

जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणूकी संदर्भात गट – गण निहाय चर्चा या बैठकी झाली. शिवसैनिकांनी तयारीस लागावे, पक्ष बांधनी, पक्ष संघटन यावर भर घालण्यासाठी जिल्हाप्रमुख आग्रही होते. यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह, जिल्हा सामान्वयक संजय महाद्वार, युवा सेना जिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, शिवसेना पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, युवासेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा चोरे, युवासेना तालुका प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ लवुल, तालुका सम्वयक आकाश कांकरिया, विशाल शिंदे, अजित अडगले, योगेश शिंदे आदी शिवसैनिक मोठया प्रमाणावर या बैठकीत उपस्थित होते.

# लिंबागणेश येथील गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागणार

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावरील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या अपघातप्रवण क्षेत्रात गतिरोधक बसवावेत या मागणीसाठी गेल्या ३–४ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार पुकारलेल्या आंदोलनाची प्रशासनाकडून अखेर दखल घेण्यात आली असुन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्हा सुरक्षा रस्ता समितीत हा विषय घेतल्यामुळे त्यांच्या आदेशाने आज दि.२६ गुरुवार रोजी सकाळी अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे आणि वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी लिंबागणेश येथे पाहणी केली. यावेळी डॉ.गणेश ढवळे, हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद उपस्थित होते. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे,वाहतुक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी प्रत्यक्ष पाहणी करत संवाद साधत, सुचना फलक लावण्याच्या सुचना देत संबंधित कंत्राटदार आणि राष्ट्रीय महामार्ग आधिका–यांना लेखी पत्रकाद्वारे कळविण्यात येणार असल्याचे सांगितले.



गेल्या ३–४ वर्षांपासून डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रास्तारोको, अपघातातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली आदी लक्ष्यवेधी आंदोलने करण्यात आली होती. तर ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी दि.१६ जुन रोजी आत्मदहनाचा इशारा दिल्यानंतर कंत्राटदाराने तात्पुरता स्वरूपात रंबलिंग स्ट्रीप मारून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र हरिओम क्षीरसागर यांनी त्याचा फारसा परिणाम होत नसल्याने गतिरोधकाची मागणी लावून धरत दि.२५ जुन रोजी आमदार आपल्या गावी, आपल्या दारीविशेष मोहिमेंतर्गत आ. संदिप क्षीरसागर यांच्या कार्यक्रमात बेलगाव याठिकाणी गतिरोधकाचा मुद्दा लावून धरत पाठपुरावा केला. अखेर आज वरीष्ठ आधिका–यांनी पाहणी करत सकारात्मकता दर्शवली त्यामुळे गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.

# काँग्रेसने देशात आणीबाणी लाऊन लोकशाहीची हत्या केली होती : शंकर देशमुख

## भाजपाच्या वतीने मिसाबंदीतील तुरुंगवास भोगलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार संपन्न

बीड । प्रतिनिधी

देशात आणीबाणी लावून काँग्रेसने लोकशाहीची हत्या केली, मानवाचे मूलभूत हक्क पायदळी तुडवण्याचे काम तत्कालीन क्रूर काँग्रेस सरकारने केले असे विचार भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले. बीड जिल्ह्यातील आणीबाणीच्या काळात तुरुंगवासात असणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवकांचा सत्कार आज बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा कार्यालयावर करण्यात आला, या प्रसंगी ते बोलत होते. भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विजयकुमार पालसिंगणकर, पंजाबराव मस्के, सत्यनारायण छगनलाल लोहिया, उद्धवराव नगरगोजे, मुरलीधर पाठक, दत्ताभाऊ तोडकरी, रामदास गायकवाड, दिलीपराव सोनवळकर, सुमनराव डुबे, उत्तमराव सोहनीवाल, शामराव राठोड यांचा आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे, नवनाथ आण्णा शिराळे, चंद्रकांत फड, सलीम भाई जहागीर, अशोक लोढा, अशोक रसाळ, उद्धव रासकर, श्रीकांत सानप पी टी चव्हाण अजय सवाई, शांतिनाथ डोरले, भूषण पवार, भाग्यश्री ढाकणे, प्रीत कोकडेजा इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



कार्यक्रमात पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख असे म्हणाले की इंदिरा गांधीच्या नेतृत्वातील तत्कालीन केंद्र सरकारने जनतेवर आणीबाणीच्या माध्यमातून अनन्वित अत्याचार केले व लोकांच्या मानवी अधिकाराचे उल्लंघन करण्याचे काम करून एक प्रकारे भारतीय राज्यघटनेची हत्या केली. याप्रसंगी पंजाबराव मस्के सत्यनारायणजी लोहिया उद्धवराव नागरगोजे विजयराव पलसिंगनकर यांनी मनोगल व्यक्त करतांना जनसंघातील कामाचे अनुभव कथन केले. जनसंघात काम करताना व्यक्तिगत लाभाची पद मिळवण्यासाठी कोणीही काम केलं नाही तर राष्ट्र टिकले पाहिजे व समाजाच्या हिताचा विचार झाला पाहिजे या विचारासाठी हजारो स्वयंसेवकांनी आपले बलिदान दिले असे विचार या प्रसंगी विविध वक्तांत्यानी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविक जिल्हा सरचिटणीस देविदास नागरगोजे यांनी जयंती तर सूत्रसंचालन शांतिनाथ डोरले व आभार प्रदर्शन अशोक लोढा यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यातसाठी उद्धव रासक, अमोल वडतीले, राजू शहाणे, विलास बामणे, संग्राम बांगर, बाबूलाल ढोरमारे, राजेश गवळी, महादेव नागरगोजे, केशव बडे, योगीराज भगत यांच्यासह जेष्ठ नागरिक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

# दत्ता देशमुख यांना अनंतराव भालेराव पत्रकारिता पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पत्रकार दत्ता देशमुख यांना राज्य शासनाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर व लातूर विभागासाठीचा देण्यात येणारा अनंतराव भालेराव पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला.



राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागातर्फे देण्यात येणाऱ्या २०२१, २०२२ व २०२३ या पुरस्कारांची घोषणा मंगळवारी (दि. २४) करण्यात आली. यात बीड येथील दैनिक सकाळचे वरिष्ठ बातमीदार दत्ता देशमुख यांना २०२१ सालचा छत्रपती संभाजी नगर व लातूर विभागासाठीचा अनंतराव भालेराव पुरस्कार जाहीर झाला. ५१ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. यापूर्वीही दत्ता देशमुख यांना 'सकाळ' तर्फे देण्यात येणारा नानासाहेब परुळेकर पुरस्कार दोन वेळा मिळालेला आहे. यासह त्र्यंबक आसरडोहकर पत्रकार पुरस्कार, मुकनायक पत्रकारिता पुरस्कार, कै. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार, आदर्श पत्रकार पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे मित्रपरिवार व हितचिंतकांतून अभिनंदन होत आहे.



मा डॉ श्री उल्लासजी गंडाळ साहेबांना आज दि २५ जुन २०२५ वार बुधवार रोजी जिल्हा आरोग्य कार्यालय कन्या शाळा बीड येथे आगळ्या वेगळ्या पद्धतीने रक्त दान करून शुभेच्छा देताना मराठवाडा आरोग्य विभाग प्रमुख नितीन महुवाले, महादेव पवार, किशोर जाधव तसेच जिल्हा आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारी वर्ग.

# ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता

## २०१४ पासून थांबली शिक्षक–शिक्षकेतर भरती : समायोजनही रखडले, रिक्तपदांमुळे शैक्षणिक संकट

पात्रुड । प्रतिनिधी

शिक्षकांची भरती २०१४ पासून थांबली, शिवाय यादरम्यानच्या काळात हजारो शिक्षक निवृत्त झाले. असे असतानाही रिक्त जागा भरल्या गेलेल्या नाहीत. परिणामी, ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पदे रिक्त आहेत.

ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये आज गणित, विज्ञान, यासारखे महत्त्वाचे विषय शिकवण्यासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या शाळांतील मुख्याध्यापकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, काही शाळांमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारीही रिक्त आहेत. दरम्यान, काही काही ठिकाणी अतिरिक्त शिक्षक असल्याचेही आढळते. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून या समायोजनाचा प्रश्न अधांतरी असून, जिथे गरज आहे, तिथे शिक्षक नाहीत आणि जिथे गरज नाही, तिथे शिक्षक जास्त आहेत. या परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जावर मोठा परिणाम होत असल्याचे आज चित्र आहे.सध्या ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या काही अतिरिक्त शिक्षकांना वेगवेगळ्या मार्गांनी शहरातील मोठ्या शाळांमध्ये समायोजित करण्यात येत आहे. त्यामुळे अनेक शिक्षक ग्रामीण भागात रुजू होण्यास इच्छुक नाहीत. याचा परिणाम असा झाला आहे की, ग्रामीणमधील खासगी अनुदानित शाळांमध्ये अनेक पदे रिक्त आहेत. दुसरीकडे, महाराष्ट्रात पहिल्या वर्गापासून हिंदी विषय अनिवार्य करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या विषयावरून राजकीय वातावरण तापले आहे. आरोप–प्रत्यारोप सुरू असतानाच खरे प्रश्न दुर्लक्षित राहात आहेत. त्यामुळे खरी गरज आहे ती पुरेसे शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची, मात्र दुखणे पायात, पण पट्टी डोक्यावर बांधली जात आहे, अशी सध्याची परिस्थिती आहे.

**खाजगी शाळांची फी भिडली गगनाला**

जिल्हा परिषद शाळा आणि खाजगी अनुदानित मराठी शाळांमध्ये गरीब व सामान्य कुटुंबातील मुले शिकतात. त्यांच्या पालकांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे ते महागड्या कॉन्व्हेंट शाळा किवा तालुका मुख्यालयातील खाजगी इंग्रजी शाळांमध्ये मुलांना शिकवू शकत नाहीत, कारण तिथल्या फी भरल्यास घरखर्च अडचणीत येतो. त्यामुळे अशा पालकांना पर्यायच नसल्याने आपल्या मुलांना गावातील शाळांमध्ये शिकवावे लागते. मात्र, या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, सुविधांचा अभाव, अशा कारणाने गरीब विद्यार्थ्यांचे नुकसानच होते आहे

# ग्रामीण भागातील बंद घरांच्या घरपट्टीत सूट

पात्रुड । प्रतिनिधी

तीन महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता प्रामीण भागातील घर बंद असल्यास त्याच्या मालकाला ग्रामपंचायतीकडून घरपट्टीत सवलत मिळू शकते. त्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करून ही सवलत मिळवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. मात्र, बहुतांश घरमालक या अधिकारापासून अनभिज्ञच आहेत.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि त्या खालोखाल कायदा कलम १२४चे पोटकलम खंड १ अन्वये इमारतींना घरपट्टी आकारण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. परंतु, काही घरे किंवा इमारती वापराविना अगदी वर्षभरही बंद असतात. मात्र, त्यांच्या मालकांना वर्षांची घरपट्टी भरण्याचा भुर्दंड सोसावा लागतो. यावर उपाय म्हणून याच नियमावलीतील एक भाग नियम १९ अन्वये या इमारती किंवा घरे तीन महिने किया त्यापेक्षा अधिक काळ बंद असल्यास अशा इमारतीच्या किंवा घराच्या मालकांना घरपट्टीत सूट मिळू शकते.ग्रामपंचायत क्षेत्रातील घरमालक तसेच त्यांच्या घरातील इतर सदस्यांना सोयीसुविधा पुरवत असते. मात्र, घरच बंद असेल तर अशा सोयीसुविधा घेण्याच्या प्रश्नच येत नाही.

# अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

न्या. आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीडच्या वतीने मध्ये अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीराचे आयोजन दिनांक २६/०६/२०२५ रोजी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, बीड येथे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली.




सदर कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड सचिव श्रीमती. रेणुका एम. सातव, प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल, डॉ.मुजाहिद ईस्माइल मनोरागतज्ञ जिल्हा शासकीय रूग्णालय बीड, अधिकारमित्र तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड, मिथुन जोगदंड, शामसुंदर शिंदे अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ओंकार नाईकवाडे, रोहन दिवे हे उपस्थित होते. या शिबीरात महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आदी हे बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल यांनी केले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड सचिव श्रीमती. सातव मॅडम म्हणाल्या यांनी अंमली पदार्थ विरोधी जागरूकता आणि नशामुक्ती दिशादर्शक अंमली पदार्थ भारत योजना २०२५ (ऊ–थछ), समितीची स्थापना व स्किम विषयी मार्गदर्शन केले, यासह शासकीय कार्यलयातील महिला वरील लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (झजडक–उढ २०१३) याबाबत मार्गदर्शन केले महिलांचे हक्क व अधिकार याविशयी मार्गदर्शन केले. डॉ.मुजाहिद मोहम्मद यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगितले व ते व्यसन कमी कसे करावे व उडवावे यावर मार्गदर्शन केले. अशोक तांगडे हे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सायबर गुन्हयांचे प्रकारे विद्यार्थ्यांना समजावुन सांगितले, सायबर गुन्ह कसे घडतात ते सांगितले, त्यावर उपाय काय करावे यावर मार्गदर्शन केले.

तत्वशिल कांबळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, बालक नशेच्या आहारी जात आहेत त्यामूळे प्रत्येक पालकाने आपला बालक काय करतो त्यांचे मित्र कोण आहेत याबाबत सजग राहणे गरजेचे आहे. किशोर वयीन बालकांसोबत मित्र बनुन रहावे व त्यांना सतत व्यसनाचे दुष्परिणाम काय आहेत याविषयी मार्गदर्शन करावे असे आवाहन केले. रोहन दिवे यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड या कार्यालयाचे कामकाज कसे केले जाते यासह सामान्य लोकासांठी न्यायालयाच्या योजना याविशयी मार्गदर्शन केले. ओंकार नाईकवाडे यांनी नालसा हेल्पलाईन नंबर १५१०० या विशयी मार्गदर्शन केले यासह युवकांनी आपल्या सभोवती जर काही घडत असेल तर त्यांची माहिती आपण कार्यालयाशी देउन अन्याय थांबवु शकतो असे सांगितले.

पान १ वरून...

## गेवराईत भंगार घोटाळ्याचा खळबळजनक पर्दाफाश

चित्रीकरण आणि दफ्तर तपासावे. तसेच, हा लिलाव रद्द करून उपविभागीय अधिकाऱ्यांसमोर पुन्हा घ्यावा. चौकशी पूर्ण होईपर्यंत तहसिलदार खोमणे यांना निलंबित करावे, अशी मागणीही त्यांनी केली. तक्रारदाराने चेतावणी दिली आहे की, २ जुलै २०२५ पर्यंत कारवाई न झाल्यास ३ जुलैपासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करेल आणि प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात नेईल. या घोटाळ्याने प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हाधिकारी काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पशुवैद्यकीय दवाखान्याच्या ६४ इमारतींचे काम रखडले; १३६ इमारतींना मंजुरी तर ६४ इमारतींसाठी उद्घाटनाची कुदळही नाही

## उपचार करायचे कुठे? पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी लक्ष देण्याची मागणी : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

शेती व्यवसायात यांत्रिकीकरण झाले असले तरी आजही बहुतांश शेतकरी जनावरांच्या जीवावर शेती करतात. शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या उपचारासाठी सुसज्ज,औषधांचा पुरेसा साठा व सोयीसुविधायुक्त ईमारतीसह कर्तव्यदक्ष पशुधन विकास अधिकारी व पशुवैद्यकीय आधिका-यांची नितांत आवश्यकता असते.जिल्हा परीषदेकडील पशुवैद्यकीय दवाखाने, प्रथमोपचार केंद्र बांधण्यासाठी मागील वर्षी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात १७ मंजुर ईमारतीपैकी अर्ध्यापेक्षा जास्त १० ईमारतींची कामे रखडलेली आहेत तर सन २०२५-२६ मध्ये सरकार येऊन ६ महिने उलटले तरी नव्याने एकही ईमारत मंजुर केलेली नाही कि त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. मराठवाड्यात १३६ इमारती मंजूर करण्यात आल्या होत्या. दरम्यान जुन्या इमारती नविन बांधकामासाठी पाडण्यातही आल्या परंतु यातील ६४ इमारतींसाठी अद्याप उद्घाटनाची







कुदळही मारण्यात आलेली नाही.परीणामी जनावरांवर उपचार करायचे कोठे? असा सवाल यानिमित्ताने पशुधन मालक विचारत असुन पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी याप्रकरणी लक्ष देऊन रखडलेल्या इमारतींचे काम मार्गी लावावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

जनावरांवर उपचार करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाने येतात.जिल्हा परीषदेकडुन जिल्हा वार्षिक योजनेतुन पशू वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. गतवर्षी मराठवाड्यातील ८ जिल्ह्यात १३६ इमारती मंजुर करण्यात आल्या होत्या. यात सर्वाधिक धाराशिव ४२ तर सर्वात कमी हिंगोली ०३ जिल्ह्यात मंजुर आहेत. पशुवैद्यकीय दवाखान्यांना इमारती उपलब्ध झाल्यास त्याठिकाणी जनावरांवर विविध उपचारासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देता येतात. गतवर्षी इमारतींना मंजुरी दिल्यानंतर कार्यारंभ आदेश झाले. दरम्यान जुन्या इमारती पाडण्यात आल्या. त्याठीकाणी नविन इमारत बांधकाम होणार असल्याने पशुपालन खुष होते परंतु पुढे मंजूर असलेले १३६ पैकी ६४ ठिकाणी अद्याप उद्घाटनाची कुदळही मारण्यात आलेली नाही.

**रखडलेल्या इमारतींचे काम पूर्ण होण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी लक्ष देण्याची गरज**

### जिल्हा निहाय मंजुर ईमारती

| जिल्हा | संख्या |
|---|---|
| बीड | १७ |
| लातुर | १४ |
| संभाजीनगर | २१ |
| जालना | १६ |
| परभणी | ११ |
| हिंगोली | ०३ |
| नांदेड | १२ |
| धाराशिव | ४२ |
| एकुण | १३६ |

### इमारतींची स्थिती

| जिल्हा- | पुर्ण - | अपुर्ण- | सुरूच नाही |
|---|---|---|---|
| बीड- | ८- | २- | २ |
| लातुर | २- | ६- | ६ |
| संभाजीनगर | ४- | १२- | ५ |
| जालना | १- | १०- | ५ |
| परभणी | ०- | ११- | ० |
| हिंगोली | ००- | ०३- | ० |
| नांदेड | ००- | ७- | ५ |
| धाराशिव | ००- | ०१- | ४१ |

**एकुण १५ पुर्ण, ५७ अपुर्ण आणि ६४ ईमारतींचे कामच सुरू नाही**

पशुवैद्यकीय दवाखाने इमारत बांधण्यासाठी १३६ कामांसाठी १३ कोटी १७ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.यात केवळ ५.५७ टक्के निधी खर्च झालेला असुन उर्वरित निधी अखर्चित आहे.सदरील निधी खर्च करून घेणे देखील जिल्हा परिषद यंत्रणेला जड जाताना दिसत आहे. सदरील निधी यावर्षी देखील खर्च होईल अशी शक्यता दिसत नाही. इमारतींना मंजुरी देऊन वर्ष उलटूनही कामे रखडलेली असली तरी ती पुर्ण करुन घेण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर म्हणावे तसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. जिल्हा परिषद यंत्रणा नेमकं करते तरी काय असा संतप्त सवाल उपस्थित करत पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यात लक्ष घालून रखडलेल्या पशू वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींचे काम मार्गी लावावे अशी मागणी केली आहे.

# गेवराईकरांच्या विविध सोयी सुविधांसाठी आपण कटिबद्ध : मा.आ.अमरसिंह पंडित

## माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या हस्ते जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे नितांत गरजेचे आहे. त्यासाठी पोहणे हा उत्तम व्यायामाचा प्रकार आहे. गेवराईला जलतरण तलावाच्या माध्यमातून उत्तम सोयी आपण उपलब्ध करुन देऊ तसेच पाण्याची गुणवत्ता, स्वच्छता, प्रशिक्षित वर्ग यामुळे नक्कीच या जलतरण तलावाचा फायदा गेवराईकरांना होतोय याचा मनस्वी आनंद आहे. महिलांसाठी प्रशिक्षित महिला परीक्षक देखील नेमण्यात येईल तसेच यापुढेही गेवराईकरांच्या विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केले. दरम्यान जलतरण स्पर्धा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवल्याबद्दल माजी सरपंच संदीप राजगुरु व ड.स्वप्निल येवले यांचे त्यांनी कौतुक केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त राजापूरचे माजी सरपंच संदीप राजगुरु, ड.स्वप्निल येवले यांच्या पुढाकाराने गेवराई शहरातील नगरपरिषद जलतरण तलाव,कोल्हेर रोड येथे जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्पर्धेचे बक्षीस वितरण माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी नगरसेवक शामकाका येवले यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड.येवले यांनी केले. तर कु.शितल कोकाटे या विद्यार्थिनीने आपले अनुभव विशद करुन गेवराई शहरात जलतरण तलावाच्या माध्यमातून योग्य सुविधा उपलब्ध केल्याबद्दल अमरसिंह पंडित साहेबांचे आभार व्यक्त केले.



तर वेगवेगळ्या वयोगटात झालेल्या या स्पर्धेमध्ये वयोगट तीन ते पाच वर्ष (मुले) त्यामध्ये शिवेंद्र जाधव, मानस शिंदे, कौस्तुभ ढाकणे, तीन ते पाच वर्ष (मुली) कु.राजेश्वरी जाधव, सहा ते नऊ वर्ष (मुले) चि.द्रोण बहिर यज्ञेश सानप, अन्वेश सानप, वयोगट सहा ते नऊ वर्ष (मुली) कुमारी पंकजा ढाकणे, सानवी जिक्रे, रितिका मोटे, वयोगट दहा ते तेरा वर्ष (मुले) अर्णव कुलकर्णी, शौर्य भालशंकर, काशीद रंजीत, दहा ते तेरा वर्ष (मुली) आर्या सानप, मानसी कोकाट, श्रुतिका मोरे, चौदा ते सोळा वर्ष (मुले) यशवंत लेंडगुळे, साहिल बालशंकर, सार्थक ढाकणे. चौदा ते सोळा वर्ष (मुली) शितल कोकाट, कीर्ती इधे, सारंगी पुरी, वयोगट सोळा ते वीस वर्ष मुले शेख शाहिद अयुब, सोळा ते वीस वर्ष (मुली) प्रगती वायकर, खुला गट पुरुष पन्नास मीटरमध्ये धनंजय मुंडे, बागेश्वर पिकवणे, सुनील जाधव. खुला गट पुरुष पन्नास मीटर बॅकमध्ये, अर्णव कुलकर्णी, सार्थक ढाकणे सर्वेश जाजू, खुला गट (महिला) पन्नास मीटर बॅक शितल कोकाट मानसी कोकाटे, प्रणिती जाजु या स्पर्धेकांना मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन अशोक गलांडे यांनी व्यक्त केले.

**नाविन्यपूर्ण उपक्रम राबवल्याबद्दल आयोजकांवर कौतुकाची थाप**

गेवराई शहरात जलतरण स्पर्धा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवल्याबद्दल माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांनी जलतरण स्पर्धेचे गेवराई शहरात आयोजन केल्याबद्दल आयोजक माजी सरपंच संदीप राजगुरु व ड.स्वप्निल येवले यांचे कौतुक करुन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी आपले कायम पाठबळ राहिल असे मत माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

# बीड येथे छत्रपती शाहु महाराज यांची १४९ वी जयंती साजरी



बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड व भारतीय धम्म महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहु महाराज यांची १४९ वी जयंती साजरी करण्यात आली असून प्रथम जोगदंड निलेश यांनी प्रतिमेस आगरबत्ती, मेनबत्ती प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमास खरात सर यांनी आपले विचार व्यक्त केले छत्रपती शाहु महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.तसेच सतिश कापसे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. त्याच प्रमाणे मजमुले धर्माजी देखील छत्रपती शाहु महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.त्याच प्रमाणे भारतीय धम्म महासंघाचे जिल्हाध्यक्ष बी.एस.काबळे यांनी देखील छत्रपती शाहु महाराज यांच्या जीवनावर आधारित बरीच माहिती व विचार व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामचंद्र गायकवाड, सुनिल जाधव, डॉ.अदिनाथ माने, भीवा जोगदंड, सुनिल समुद्रे, जोगदंड निलेश, मजमुले धर्माजी, सतिश कापसे, बी.आर.गायकवाड, खरात सर, भीवा जोगदंड यांनी शेवटी आभार मानले व कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

**टि. सी. हरवला आहे**

वैभव राम कुंडकर रा. गोविंदपूर ता. माजलगांव जि. बीड याचा बारावी पास चा टिसी दि.१३/६/२०२५ रोजी माजलगाव ते गोविंदपुर रिक्षा प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करा.

मो.९३७३४९४१०४

# जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुलेमान देवळा प्रवेशोत्सव कार्यक्रम विविध उपक्रमाने संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा या ठिकाणी इयत्ता पहिली व नवीन शाळा दाखल मुले यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम, लेझीम, ढोल व डिजे या साहित्य सह फेरी मारून जनजागृती करून शाळेविषयी माहिती दिली.



कार्यक्रमाला गावातील तरुण मंडळ व सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी, पालक वर्ग व गावातील सरपंच व उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी खोरदे, गट शिक्षणाधिकारी सीमा टकले काळे मॅडम व केंद्र प्रमुख जावेद पठाण शाळेचे मुख्याध्यापक श्री.भाऊसाहेब चव्हाण सर, साळुंखे सर, खांडवी सर, गव्हाणे सर, लगड सर, म्हस्के सर, जगताप मॅडम, सायंबर सर, जाधव सर, कुंडलिक काळे सर, अरुण दातार सर यांच्या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात साजरा केला.

# रुई नालकोल येथील संजना बनसोडे यांच दु:खद निधन

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील रुई नालकोल येथील सौ संजना सुनील बनसोडे यांचं अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले त्यांचा अंत्यविधी दि: २४/०६/२०२५ रोजी रुई नाल्कोल येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात झाला. त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व कायम हसतमुख असं व्यक्तिमत्व होतं. त्या आष्टी परिवहन मंडळात वाहक या पदावर कार्यरत होत्या. तसेच सेवा सोसायटी चे चेअरमन बबन पांडुरंग नन्नवरे यांच्या पुतणी होत्या व प्रा.संदीप ननवरे यांच्या बहीण होत्या व त्यांच्या पश्चात पती सुनील बनसोडे व दोन मुली असा त्यांचा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी रुई नालकोल येथील अमरधाम येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात झाला. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दि: ०३/०७/२०२५ रोजी रुई नालकोल येथे होईल.

# आदिशक्ती संत मुक्ताबाई पालखी सोहळयातील वारकऱ्यांना नेकनुर पोलीसाच्या वतीने फळवाटप

चौसाळा । प्रतिनिधी



आदीशक्ती संत मुक्ताबाई पालखी सोहळयातील वारकऱ्यांना आज चौसाळा बायपास याठिकाणी नेकनूर पोलीस स्टेशन मार्फत फळवाटप करण्यात आले. यावेळी नेकनुर पोलिस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक मांगरमे साहेब, पि.एस.आय. रोकडे साहेब, पि.एस.आय. आहेर साहेब, पो.ह. क्षीरसागर साहेब, पो.ह. मुरुमकर, पो.ह. घुले साहेब, पो.ह. सानप, पो.शी. ढाकणे साहेब, पो.ह. पुंडे, पो.ह. गर्जे साहेब इत्यादी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# महिला कला महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

येथील महिला कला महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व दिनविशेष समितीच्या वतीने दि. २६/०६/२०२५ रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी सांगितले की, छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे भोसले घराण्यातील कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. २६ जून हा दिवस सामाजिक न्यायदान दिवस म्हणून देखील साजरा केला जातो. राजर्षी शाहू महाराज यांनी समाज उपयोगी अनेक निर्णय घेतले आणि त्याची १०० टक्के अंमलबजावणी केली म्हणूनच त्यांना लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांनी शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक स्तरावर राज्यात मागे पडत असलेल्या लोकांसाठी काम केले. जात - पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. त्यांना आरक्षणाची जनक म्हणून देखील ओळखले जाते, असे सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बबन बोबडे (रासेयो कार्यक्रमाधिकारी व दिनविशेष समिती प्रमुख) यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार डॉ. ज्योती गायकवाड (रासेयो सह कार्यक्रमाधिकारी) यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अंबाजोगाई येथील सिरसाट कोचिंग क्लासेसचे अभूतपूर्व यश

## योगेश्वरी पॉलीटेक्निक कॉलेजच्या एकुण २० विद्यार्थ्यांनी घेतले गणित विषयात १०० पैकी १०० गुण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील नामांकित योगेश्वरी शिक्षण संस्थे अंतर्गत असणारे पॉलिटेक्निक कॉलेज यावर्षी गुणवत्तेत मराठवाड्यात सर्वप्रथम आले असून कॉलेजमधील प्रा.नारायण सिरसाट यांच्या गणित विषयात तब्बल २० विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण घेतल्याने कॉलेजसह प्रा.सिरसाट यांच्या खाजगी सिरसाट कोचिंग क्लासेसचेही मोठे कौतुक होत आहे.



मराठवाड्याचे शैक्षणिक माहेरघर म्हणवणाऱ्या अंबाजोगाई येथील नामांकित अशा योगेश्वरी शिक्षण संस्थेने अलीकडच्या दशकात सुरू केलेल्या पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये दरवर्षी अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्तीर्ण होतात. शिवाय कॉलेज कॅम्पसमध्येच शेवटच्या वर्षात पुणे-मुंबई-नाशिक येथील कंपन्या येऊन थेट मुलाखती घेऊन अनेक विद्यार्थ्यांना नौकरीची सुवर्णसंधी उपलब्ध करून हाताला कामही देतात. यामुळे या संस्थेत प्रवेश घेण्याकडे पालक व विद्यार्थ्यांचा चांगलाच कल वाढलेला आहे. अशा या नामांकित संस्थेच्या पॉलिटेक्निक कॉलेजनेही आता चांगलीच भरारी घेतल्याने मराठवाड्यामध्ये या कॉलेजची सुद्धा आता वेगळीच ओळख निर्माण झाली आहे. कॉलेजचे यशस्वी प्राचार्य प्रा. रमणजी देशपांडे यांच्या अगदी शिस्तबद्ध नियोजन व काटेकोरपणे असलेल्या लक्षाने आणि त्यांना प्रा.नारायण सिरसाट यांच्यासारख्या नामांकित गणित तज्ञाची खंबीर साथ व ईतरही प्राध्यापक-कर्मचाऱ्यांची मोलाची साथ असल्यानेच फारच कमी वेळात योगेश्वरी पॉलीटेक्निक कॉलेज मराठवाड्यात तर पहिल्या क्रमांकावर राहत नावारुपाला आले आहेच. परंतु आता महाराष्ट्रातील नामांकित पॉलीटेक्निक कॉलेज सोबत अंबाजोगाईच्या योगेश्वरी पॉलिटेक्निक कॉलेजची तुलना होत आहे. याचा फार मोठा आनंद होत असल्याची भावना प्रा.नारायण सिरसाट यांनी बोलून दाखवली.

या महाविद्यालयातील प्रा. नारायण सिरसाट यांचे सिरसाट कोचिंग क्लासेस नावाने गणित विषयाचे खाजगी ट्युशन चालते. शालेय जीवनापासून गणित पक्के असल्याने आणि स्वतःचे अभियांत्रिकी शिक्षण घेतानाही सातत्याने गणित विषयात पैकीच्या पैकी मार्क घेणारे नारायण सिरसाट यांचे गणित शालेय जीवनापासूनच अगदी पक्के होते. स्वतः ट्युशन घेत-घेत सिरसाट हे पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सुद्धा प्राध्यापक म्हणून काम करतात. कॉलेजच्या सुरुवातीपासूनच त्यांच्या विषयामध्ये बहुतांशी विद्यार्थी प्राधान्याने प्राविण्याने आहेत. परंतु यावर्षी मिळवलेले यश मात्र अगदीच उल्लेखनीय आणि नोंदीव आहे. याचे कारण ही तसेच आहे. प्रा. नारायण शिरसाट यांच्याकडे खाजगी ट्युशन लावलेले पॉलीटेक्निक कॉलेजच्या २० विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण घेऊन कॉलेजच्या निकालात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे यश संपादन केलेल्या यशवंत विद्यार्थ्यांसह योगेश्वरी पॉलिटेक्निक कॉलेजच्या सातत्यपूर्ण यशासह प्रा. नारायण सिरसाट यांच्या सिरसाट कोचिंग क्लासेसची आणि वैयक्तिक प्रा. सिरसाट यांची चर्चा मात्र संपूर्ण मराठवाडाभर होत असून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष-सचिव, संचालक मंडळासह प्राचार्य-उपप्राचार्य, संपूर्ण प्राध्यापक व कर्मचारी, विशेष करून विद्यार्थ्यांचे पालक यांच्यासह समाजातील सर्वच स्तरातून प्रा.नारायण सिरसाट यांच्यावरती कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# केशव पंडीत पोलिसांना दिले चॉकलेट सापडुनही सापडेना?

## पोलिसांच्या दुर्लक्षांमुळे सहकार क्षेत्रातील गुन्हेगारी वाढली?



गेवराई । प्रतिनिधी

श्री. मंगलनाथ मल्टीपल निधी बँकेचे अध्यक्ष केशव शेषनारायण पंडित याने गेवराई येथील ठिकाणच्या शाखांमधून तीन कोटींपेक्षा अधिकच्या ठेवी गोळा करून चार महिन्यापासून फरार झाला आहे. या प्रकरणात छत्रपती संभाजी नगरीतील रहिवासी असलेले प्रदीप दीक्षित यांनी लेखी तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी केशव पंडित याचा शोध न घेतल्याने पोलीस प्रशासनावर प्रश्नंचिन्ह निर्माण झाले आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासून पोलिसांना चकवा देत आहे.

श्री. मंगलनाथ मल्टीपल निधीच्या माध्यमातून लोकांना जास्त व्याजदराचं प्रलोभन दाखवून ठेवीदारांकडून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी बँकेत जमा करून घेतल्या. मात्र बँकेच्या अध्यक्ष केशव शेषनारायण पंडित आणि त्यांची पत्नी तथा संचालक असणाऱ्या योगिता केशव पंडित यांच्यासह सचिव यांनी कोट्यवधी रुपयांच्या ठेवीवर व्याज देण्याऐवजी स्वत:च्या स्वार्थासाठी ठिकठिकाणी मालमत्ता खरेदी केल्या. तसेच एकाच जागेवर ग्रामीण व शहरी भागाचा पीटीआर करून नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या संगनमताने मालमत्तेची विल्हेवाट केली असल्याची चर्चा आहे व याशिवाय इतर ठिकाणीही काही पैसा खर्च केला. बँकेत ठेवीदारांनी ठेवलेल्या ठेवींची मुदत संपली. यानंतर नागरीक आपले पैसे घेण्यासाठी बँकेत गेले. मात्र ठेवीदारांना त्यांची रक्कम देण्यासाठी बँकेकडे पैसेच नव्हते. यानंतर बँकेकडून ठेवीदारांना आज पैसे देतो, उद्या पैसे देतो, असे म्हणून गेले काही टाळाटाळ करत असल्याचा प्रकार समोर आला तसेच २३ मार्च २०२५ रोजी सकाळी मनोरुग्ण असल्याचा देखावा करत संबंधित चेअरमनच्या मेव्हण्याच्या साथीने हॉस्पिटल मधूनच पळ काढला होता अशी चर्चा ठेविदार बांधवांकडून व्यक्त होत आहे.

त्यामुळे ठेवीदारांनी पोलिसात धाव घेतलीय पण् दिलेल्या तक्रारीकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे पाहायला मिळाले याबाबत केशवाने पोलिसांना दिले चॉकलेट सापडुनही सापडेना? असे म्हणण्याची वेळ आता खातेदारावर आली आहे दीक्षित यांच्या तक्रारीवर बीड जिल्ह्याचे एसपी नवनीत कॉवत यांनी दखल घेऊन गेवराई पोलीस ठाणे प्रमुखाला आदेश पत्र जारी करत तात्काळ चेअरमन केशव पंडित यांना शोधण्यासाठी पथक स्थापन करावे अशी मागणी होत आहे.

# अवैध विक्रीला प्रतिबंध : परळी शहर पोलिसांची गुटखा कारवाई




परळी । प्रतिनिधी

परळी शहर पोलिसांनी माघील काही दिवसामध्ये आपल्या हद्दीत गुटखा विक्री करणारे. मटका व इतर जुगार अड्ड्यावर कारवाई करत अनेकाविरुद्ध गुन्हा दाखल करून कारवाई सुरू केली आहे. शहर पोलिसांच्या या कारवाईमुळे गुटखा विक्रीची साखळी तोडण्याचा प्रयत्न पोलीस करताना दिसत आहेत.

परळी शहरात गुटखा विक्री. सर्रासपणे सुरू होती. परळी शहर पोलीस ठाण्याचे पो.नि रघुनाथ नाचन यांनी याबाबत कठोर भूमिका घेत हद्दीमध्ये सुरू असलेल्या छोट्या. मोठ्या गुटखा. विक्रेत्याविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. कारवाईदरम्यान मांडवली करण्यासाठी आलेल्यांना कुठलाही थारा न देता या कारवाया केल्या जात असल्याने गुटका विक्रीची मजबूत चैन उध्वस्त होत आहे. तीन दिवसांपूर्वी दुचाकीवरून विक्रीसाठी नेण्यात येणाऱ्या ४६ हजार रुपयाचा गुटखा पकडून तिघा विरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी गुटखा विक्री विरोधात कारवाई केल्याने गुन्ह्याचे प्रमाण कमी होत आहे. परळी शहर पोलिसांची कारवाई या धंद्यामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष गुंतलेल्यांच्या लागत असली तरी या कारवाईचे सर्वसामान्य जनतेतून परळी शहर पोलिसांचे कौतुक होत आहे.

# चौसाळा येथील भीमनगर येथील सिमेंट बाकडयाची अज्ञात समाज कंटकाने केली तोडफोड

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील भीमनगर याठिकाणी ग्रामपंचायत मार्फत बसविण्यात आलेल्या सिमेंट बाकडयाची अज्ञात समाज कंटकाने तोडफोड केल्याची घटना उघडकीस आली असुन यामुळे आंबेडकरी जनतेमधुन




तिव्र प्रतिक्रिया उमटत असुन संबंधित समाजकंटकाला तात्काळ अटक करण्यात यावे अशी मागणी समस्त आंबेडकरी जनतेतून होत आहे.

> संबंधित समाजकंटकाने भीम नगर येथील सिमेंट बाकडयाची तोडफोड केली असुन यामुळे समस्त आंबेडकरी जनतेत ञिव रोष असुन तरी पोलीस प्रशासनाने तात्काळ या घटनेची दखल घेऊन संबधीत संमाज कंटकाला तात्काळ अटक करावी अन्यथा समस्त आंबेडकरी समाजाला सोबत घेऊन ञिव स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल.
>
> – विवेक कुचेकर, सामाजिक कार्यकर्ता चौसाळा



# विस्तार अधिकारी गंगाखेडकर व ज्ञान फाउंडेशन चे उजगरे यांनी अंधापुरी घाट जि प शाळेला दिली भेट

बीड । प्रतिनिधी

जि प प्रा शाळा अंधापुरी घाट येथे शिक्षण विस्तार अधिकारी गंगाखेडकर मॅडम तसेच ज्ञान फाउंडेशन चे सुशिल उजगरे सर यांनी शाळेस भेट दिली. यावेळी शाळेच्या शैक्षणिक विकासाचा त्यांनी आढावा घेतला व शाळेच्या एकूण कामकाजाचे कौतुक केले तसेच शाळेचा विकास, विद्यार्थ्यांची गुणवत्ता अधिक विकसित करण्यासाठी गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी प्रमुख उपस्थिती संरपच पप्पू जगताप, उपसरपंच बाळू टेकडे, बाबु अण्णा टेकडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोरख जगताप, पालक उपस्थित होते.

# विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करताना टिप्पर पकडला

## अंभोरा पोलिसांची कारवाई; दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

दौलावडगाव । प्रतिनिधी

बीड–अहिल्यानगर राज्य महामार्गावरील धामणगांव येथील पाथर्डी चौकात विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करण्यासाठी वाळूने भरलेला टिप्पर असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना मिळताच त्यानी रविवारी रात्रीच्या दरम्यान सापळा रचून ताब्यात घेत कारवाई केली. दहा लाख तीस हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील धामणगांव येथील पाथर्डी चौकात रविवारी रात्रीच्या दरम्यान वाळूने भरलेला टिप्पर असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना समजातच त्यांनी सापळा रचून कलम ३०३ (२) नुसार पोलीस अंमलदार बालाजी होळंबे याच्या फिर्यादीवरून आरोपी विलास नाना बोरूडे ता.पाथर्डी याच्यावर गुन्हा दाखल करत अटक करून दहा लाख तीस हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, पोलीस अमलदार शिवदास केदार, बालाजी होळंबे, चालक पठाण यांनी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे हे करीत आहेत.

# जळगव्हाण येथील अंगणवाडी ते जि.प.प्रा.शाळाचे शौचालय पण खाल्ल : कैलास जाधव

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील जळगव्हाण गावात ग्रामपंचायत कार्यालय. शासकीय योजना आणि सर्वजनिक सुविधांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून केला आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने ३० जुन रोजी पंचायत समिती परळी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा ग्रामस्थांकडून दिला आहे. कैलास जाधव, शारदाबाई पडीत, बाळु पंडित, विनोद जाधव आणि रमेश राठोड आदींनी मिळुन पत्रकारांशी बोलताना अनेक धक्कादायक बाबीचा प्रदाँफाश केला.

त्यांनी सांगितले की, ग्रामपंचायत कार्यालयाची अवस्था अडागळीच्या खोलीसारखी झाली असून दाराला कुलूप नाही. केवळ तारेने दार अडकवले जाते. पावसाचे पाणी थेट कार्यालयात शिरते आणि त्यामुळे दस्तऐवजचे नुकसान होते. ग्रामस्थांनी आरोप केला की, ग्रामपंचायत निवडणुकीत मतदान न करणाऱ्या नागरिकांना राजकीय दोषातून दिला जातो. त्यांच्या घरासमोर जाणून भोजन खड्डे ठेवले जातात. हात बंद केले जातात. तर काही न पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवले जाते. ग्रामस्थांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. तो म्हणजे अंगणवाडी सेविकेची सातत्याने सुरू असलेली अनुपस्थिती ही सेविका सरपंचाची सून असून ती तिसऱ्या अपत्याच्या कारणावरून गेल्या सहा महिन्यापासून गैरहजर आहे. या सेविकेच्या गैरहजरीमुळे अंगणवाडीत येणाऱ्या बालकांचे शिक्षण, पोषण आणि आरोग्याची कामे टप्प झाली आहेत. यामुळे ग्रामस्थांनी ३० जुन २०२५ रोजी पंचायत समिती परळी कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास आंदोलन आदिक करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

मनरेगा योजनेअंतर्गत आणि नियमितता महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार आम्ही योजनेत (मनरेगा) मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. कोणतेही काम प्रत्यक्षात न करता मस्टरवर बनावट नावे चडवुन बिले काढले जात आहेत. यामुळे शासनाच्या निधीचा गैरवापर होत आहे. ग्रामस्थांनी याबाबत पंचायत समितीकडे तक्रारी केल्या असल्या तरी कारवाई झालेली नाही. प्रशासनाकडे तक्रारी व्यर्थ या सर्व प्रकारची तक्रार पंचायत समिती प्रकल्प अधिकारी महिला व बालविकास विभाग जिल्हाधिकारी बीड आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे १७ जून रोजी करण्यात आली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

आरओ टाक्या गायब झालेल्या दिसून आल्या आहेत. गावात पिण्याच्या पाण्यासाठी बसवण्यात आलेल्या आर ओ फिल्टरच्या टाक्या रात्रीच्या वेळी सरपंच आणि काही व्यक्तींनी टेम्पो भरून नेल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे गावातील शुद्ध पाण्याच्या सविदेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळेतील शौचालयाचा देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली ३ लाख रुपयाचा निधी खर्च टाकण्यात आला. प्रत्यक्षात कोणतेही दर्जेदार काम झाले नसल्याचे ग्रामस्थांचे मन्हने आहे. केवळ रंगरंगोटी करून मोठ्या प्रमाणावर बिले उचलले गेले आहेत. असे बरेच प्रकाराचा भ्रष्टाचार या गावामध्ये झालेला दिसून येत आहे तरी प्रशासनाने गंभीर रित्या दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.



# महाराष्ट्रात दोन ठिकाणी महापुरुषांची विटंबनेस कारणीभूत समाजकंठकास कठोर शिक्षा करा : पुरोगामी पत्रकार संघ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रात नुकत्याच पनवेल आणि चाकूर (जि.लातूर) या दोन ठिकाणी महापुरुषांची विटंबना झालेल्या घटना समोर आल्या आहेत. या दोन्ही घटनेतील आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ शाखा केजच्या वतीने केज तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पनवेल शहरात असलेला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णकृती पुतळ्याचे एका समाजकंटकाने विटंबना करण्याचा प्रयत्न केला व चाकूर (जि.लातुर) येथे भूमि अभिलेख कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या त्या समाजकंटकावर प्रशासनाने कठोरात कठोर शिक्षा करावी व या समाजकंटकाच्या मागे



कोणाचा हात आहे, याचा शोध घेऊन त्यास कठोर शासन करण्याची मागणी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ केज शाखेच्या वतीने केज तहसिलदार कार्यालयात निवेदणाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी संघाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष अनिल वैरागे, संघाचे केज तालुका अध्यक्ष दिनकर जाधव, ता.सचिव मनोराम पवार, मा.तालुकाध्यक्ष रंजित घाडगे, सचिन भालेराव, सचिन लांडगे, कल्याण मस्के, पत्रकार तात्या गवळी यांची उपस्थिती होती.

> महापुरुषांच्या पुतळ्याच्या विठंबनेचे प्रकार वारंवार घडत आहेत. आशा समाजविघातक आणि निंदणिय घटनेस कारणीभूत असणार्या समाजकंठकास सरकार आणि प्रशासनाने पाठबळ देता कामा नये. अशा दुर्घटना करणाऱ्यास प्रशासनाने वेळीस धडा शिकवला पाहिजे.
>
> **– दिनकर जाधव,**
> केज तालुका अध्यक्ष, राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ

# दैठणाघाट येथे अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल असून सुध्दा आरोपी मोकाट, उधारे कुटुंबियाची एस.पी.कडे धाव

बीड । प्रतिनिधी

लताबाई बापुराव उधारे, रा. दैठणा घाट ता. परळी वै.जि. बीड येथील रहीवासी असुन पती बापुराव आप्पा उधारे, दोन मुल नामे आप्पाराव व विजय यांच्यासह राहते. माझे पती बापुराव आप्पा उधारे हे मागिल अडीच वर्षापासुन दैठणाघाट ता. परळी वे येथील सरपंच म्हणून काम करत आहेत. माझ्या पतीला ग्रामपंचायतचे काम करण्यास आमच्या गावातील हनुमंत अशोक गुट्टे व इतर लोक हे विरोध करत असुन त्यांच्या विरोधात माझ्या पतोने मागिल एक महिण्यापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे तक्रारी अर्ज दिलेला आहे.

विजय दिनांक ०३/०६/२०२५ रोजी सायंकाळी माझे पती बापुराव आप्पा उधारे व मुलगा बापुराव उधारे हे दोघे अंबाजोगाई येथे आमच्या नातेवाईकाकडे गेलेले होते. मी घरी एकटीच होते. आमच्या घराची लाईट गेल्यामुळे रात्री १०.०० वा. सुमारास मी माझी ननंद छटुवाई देवीदास शिंदे हिच्याकडे जात असताना आमच्या गावाच्या भगवान बाबा चौकात, बस स्टैंड समोर आरोपी हनुमंत गुट्टे, शिवाजी श्रीपती गुट्टे, गोविंद दादाराव गुट्टे हे माझ्या जवळ येऊन तुझा नवरा आमचे काम आडवतो का? त्याला नीट समजावून सांग, असे म्हटल्यावर माझे नव–याने काय चुकीचे केले असे म्हणताच, ये मांगटे आम्ही तुम्हाला कच–यातून काढून इतपर्यंत आणले आहे आणि तुझा नवरा आता आमच्या विरोधात अर्जफाटे करता का? असे म्हणून मला शिव्या देऊ लागले व पुन्हा आम्हाला ग्रामपंचयायतचे कामाबदल विचारणा केली तर आम्ही तुमच्या संपूर्ण कुटंबाला जिवे मारुन टाकु अशा धमक्या देऊ लागले, वगैरे फिर्यादवरुन दिनांक १०/०६/२०२५ रोजी पो.स्टे. परळी ग्रामीण गु.र.नं. २५९ / २०२५ कलम ३५२.३५१ (२), ३५१ (३),३ (५) भारतीय न्याय संहोता सह कलम ३(१) (१), ३(१) (ड), ३(२) (ीं–र) अ.जा.ज.अ.प्र. का प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हे अत्यंत गुंड प्रवृत्तीचा असून तो माझा गावातील रहिवासी आहेत. सदर आरोपी व इतर यांनी माझ्या जवळ येऊन तुझा नवरा आमचे काम आडवतो का ? त्याला नीट समजावून सांग, ये मांगटे आम्ही तुम्हाला कचयातुन काढून इतपर्यंत आणले आहे. आणि तुझा नवरा आता आमच्या विरोधात अर्ज फाटे करता का? असे म्हणून मला शिव्या देवून माझ्या संपूर्ण कुटंबाला जिवे मारुन टाकू अशा धमक्या देऊ लागले. सदर आरोपीचे गावामध्ये जास्त लोक असल्यामुळे व आमचे समाजाचे लोक कमौ असल्यामुळे कधीही आमच्या घरावर हल्ला करून आमच्या कुटुंबाला जीवे मारण्याची शक्यता आहे. माझे पती सरपंच असल्यामुळे त्यांना वेळी अवेळी कोठेही जावे लागते त्यामुळे सदर आरोपी मोकाट गावात फिरत असून ते त्यांना काय करतील याचा नेम नाही. ते आम्हाला गावा मध्ये राहू देणार नाही व सतत त्रास देतील त्यामुळे माझा व माझा कुटुंबाच्या जीवितास धोका होण्याची दाट शक्यता आहे. तसेच वरील सर्व प्रकारामुळे मला व माझे पती यांना घराबाहेर पडणे देखील अवघड झाले आहे. तसेच सदर आरोपी साक्षीदारांवर दबाव टाकुन त्यांना धमकावत आहेत. सदर आरोपींनी न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

माझे पती हे जनतेतून निवडुन येवून सरपंच झालेले आहेत. ग्रामसेवक व वरील लोक आपसात संगनमत करुन लाखो रुपयाची कामे बोगस दाखवून भ्रष्टाचार करीत आहेत. आाजपर्यंत त्यांनी कोणत्याच कागदपत्रावर सही केली नाही किवा विकासकामाच्या कोणत्याही प्रस्तावावर सह्या केल्या नाहीत. त्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कापासून वंचित ठेवले जात आहे. त्यामुळे अशा परिस्थिती मध्ये जर आरोपीना अटक केले नाही तर त्यांचे मनोबल उंचावून व पोलीस प्रशासनाची भीती न बाळगता मला व माझ्या कुटुंबियाच्या जीवितास धोका करण्याची दाट शक्यता आहे. तसेच माझ्या कुटुंबावर अन्य प्रकारे गंभीर गुन्हा करण्याची दाट शक्यता आहे.तरी आपणास विनंती करण्यात येते की, आरोपी हनुमंत गुट्टे, शिवाजी श्रीपती गुट्टे, गोविंद दादाराव गुट्टे यांना तात्काळ अटक करुन मला न्याय देण्यात यावा अशा मागणीचे निवेदन देऊन उधारे कुटुंबीयांनी एस पी यांच्याकडे मागणी केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT